महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय कोल्हापूर विभाग कोल्हापूर
हत्तीमहल,सोमवार पेठ,गंजीगल्ली कोल्हापूर ४१६ ००२
दुरध्वनी 0231 2543894 Email - dydekop@gmail.com Website-ww.dydekop.org

क्रमांक प्राथ-१/२०२६/ 1829796/3378

दिनांक :- एप्रिल २०२६
06 APR 2026

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/योजना/मनपा) जिल्हा परिषद
कोल्हापूर/सांगली/सातारा/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/इचलकरंजी
सर्व प्रशासन अधिकारी ,प्राथमिक शिक्षण मनपा/नपा/नप कोल्हापूर विभाग

विषय:-राज्यातील शाळांची पटपडताळणी करणेबाबत

संदर्भ :- मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) व( प्राथमिक)शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे संयुक्त स्वाक्षरीचे पत्र क्रमांक शिसंमा/टि-८ब/२०२५-२६/१८२०१२९/दिनांक ३१ मार्च २०२६

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भीय पत्रान्वये शाळांची पटपडताळणी करण्याबाबत खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आलेल्या आहेत.

1. इयत्ता 10 वी व इयत्ता 12 वी विद्यार्थ्यांची पटपडताळणी करण्याची आवश्यकता नाही. बोर्डाच्या परीक्षेमधील विद्यार्थी उपस्थिती ही ग्राह्य धरण्यात येईल.
2. शैक्षणिक सत्र 2025-26 मध्ये इयत्ता 11 वी मधील विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षेतील मराठी, इंग्रजी आणि भौतिकशास्त्र या विषयांच्या परीक्षेच्या दिवशी पटपडताळणी करण्यात यावी.
3. इयत्ता 2 री ते इयत्ता 8 वी च्या वर्गाच्या बाबतीत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी आयोजित केलेल्या नियतकालिक मूल्यांकन चाचणी (PAT) परीक्षेच्या दिनांकादिवशी म्हणजेच 11/04/2026, 15/04/2026,22/04/2026 रोजी करण्यात यावी.
4. इयत्ता 9 वी या वर्गाच्या बाबतीत पटपडताळणी उपरोक्त तारखांच्या (11/04/2026, 15/04/2026,22/04/2026) दिवशीच करणे नियोजित आहे.
5. राज्यातील सर्व शाळांमधील पटपडताळणी दिनांक 11/04/2026, दिनांक 15/04/2026 व दिनांक 22/04/2026 या तीन दिवशी करण्याच्या अनुषंगाने इयत्ता 9 वी चे मराठी, गणित व इंग्रजी या विषयांची वार्षिक परीक्षा अनुक्रमे दि. 11 एप्रिल 2026, 15 एप्रिल 2026 व 22 एप्रिल 2026 रोजी आयोजित करण्यात यावेत.
6. तसेच इयत्ता 11 वीच्या बाबतीत मराठी, भौतिकशास्त्र व इंग्रजी या विषयांची वार्षिक परीक्षासुध्दा अनुक्रमे दि.11 एप्रिल 2026, 15 एप्रिल 2026 व 22 एप्रिल 2026 रोजी आयोजित करण्यात यावेत. जेणेकरुन राज्यातील सर्व शाळांमधील इयत्ता 2 री ते इयता 9 वी व इयत्ता 11 वी ची पटपडताळणी उपरोक्त तीन दिवशी पूर्ण होईल.

7. राज्यातील शाळांची पटपडताळणी करण्याचे अनुषंगाने स्टुडंट पोर्टलवर HM Login, Cluster Head Login, व BEO Login व EO Login वर सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे. पटपडताळणीच्या अनुषंगाने शाळेसभेट देणारे पथक उपरोक्त लॉगीनचा वापर करून हजर व गैरहजर विद्यार्थ्यांची नोंद करतील. या सुविधेबाबत सविस्तर माहीती / सूचना आपणास 7 एप्रिल 2026 रोजी किंवा तत्पूर्वी कळविण्यात येईल.
8. राज्यातील शाळांची पटपडताळणी करण्यासाठी पुरेसे मनुष्य आवश्यक आहे. त्यासाठी क्षेत्रीय स्तरावरील केंद्र प्रमुख, गट शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथ/मध्य/योजना) लेखाधिकारी, अधीक्षक (शालेय पोषण आहार), जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) चे अधिव्याख्याता, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक चे अधीक्षक व विस्तार अधिकारी संवर्ग इ. यांची नेमणूक शाळेस भेट देणारे पथक म्हणून करावी व शाळेस प्रत्यक्ष भेट देवून पटपडताळणी करण्यासाठी नेमणूक करण्यात यावी.
9. शिक्षणाधिकारी (माध्य/प्राथ) यांनी शाळा निहाय पटपडताळणीचे नियोजन आपल्या पातळीवरुन एकत्रितपणे करावे.अंमलबजावणी प्रभावीपणे होईल याकडे लक्ष द्यावे,

सोबत:- संदर्भीय पत्राची प्रत

Digitally signed by
Prabhavati Muralidhar Kolekar
Date: 06-04-2026 16:52:57

(प्रभावती कोळेकर)
विभागीय शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग कोल्हापूर

प्रत माहितीस्तव सविनय सादर
मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे ४११ ००१.
मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,म.रा.पुणे ४११ ००१.

महाराष्ट्र शासन

# शिक्षण संचालनालय

# (माध्यमिक व उच्च माध्यमिक)

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,
डॉ‌ॲनी. बेझंट मार्ग, पुणे ४११ ००१
ईमेल: doesecondary1@gmail.com/doehighersec@gmail.com

दूरध्वनी क्रमांक : 020 – 26121394/96

दिनांक:

क्र. शिसंमा/ टि-८ब /२०२५-२६/ 1820129

31 MAR 2026

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)

शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) जिल्हा परिषद (सर्व)

शिक्षण निरीक्षक (पश्चिम, दक्षिण, उत्तर) बृहन्मुंबई

विषय: -राज्यातील शाळांची पटपडताळणी करणेबाबत.

संदर्भ:- शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासनपत्र क्रमांक: लवेसु-१२२५/प्र.क्र.१०/२५/एसएम.३,दिनांक ०३.११.२०२५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने राज्यातील शाळांची पटपडताळणी करण्याबाबत खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी विद्यार्थ्यांची पटपडताळणी करण्याची आवश्यकता नाही. बोर्डाच्या परीक्षेमधील विद्यार्थी उपस्थिती ही ग्राह्य धरण्यात येईल.

२. शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये इयत्ता ११ वी मधील विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षेतील मराठी, इंग्रजी आणि भौतिकशास्त्र या विषयांच्या परीक्षेच्या दिवशी पटपडताळणी करण्यात यावी.

३. इयत्ता २ री ते इयत्ता ८वी च्या वर्गाच्या बाबतीत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी आयोजित केलेल्या नियतकालिक मूल्यांकन चाचणी (PAT) परीक्षेच्या दिनांकादिवशी म्हणजेच ११/०४/२०२६, १५/०४/२०२६,२२/०४/२०२६ रोजी करण्यात यावी.

४. इयत्ता ९ वी या वर्गाच्या बाबतीत पटपडताळणी उपरोक्त तारखांच्या (११/०४/२०२६, १५/०४/२०२६,२२/०४/२०२६) दिवशीच करणे नियोजित आहे.

५. राज्यातील सर्व शाळांमधील पटपडताळणी दिनांक ११/०४/२०२६, दिनांक १५/०४/२०२६ व दिनांक २२/०४/२०२६ या तीन दिवशी करण्याच्या अनुषंगाने इयत्ता ९ वी चे मराठी, गणित व इंग्रजी या विषयांची वार्षिक परीक्षा अनुक्रमे दि. ११ एप्रिल २०२६, १५ एप्रिल २०२६ व २२ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात यावेत.

६. तसेच इयत्ता ११ वीच्या बाबतीत मराठी, भौतिकशास्त्र व इंग्रजी या विषयांची वार्षिक परीक्षासुध्दा अनुक्रमे दि.११ एप्रिल २०२६, १५ एप्रिल २०२६ व २२ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात यावेत.जेणेकरुन राज्यातील सर्व शाळांमधील इयत्ता २ री ते इयत्ता ९ वी व इयत्ता ११ वी ची पटपडताळणी उपरोक्त तीन दिवशी पुर्ण होईल.

७. राज्यातील शाळांची पटपडताळणी करण्याचे अनुषंगाने स्टुडंट पोर्टलवर HM Login, Cluster Head Login, BEO Login व EO Login वर सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे. पटपडताळणीच्या अनुषंगाने शाळेस

भेट देणारे पथक उपरोक्त लॉगीनचा वापर करुन हजर व गैरहजर विद्यार्थ्यांची नोंद करतील. या सुविधेबाबत सविस्तर माहीती / सूचना आपणास ७ एप्रिल २०२६ रोजी किंवा तत्पूर्वी कळविण्यात येईल.

८. राज्यातील शाळांची पटपडताळणी करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ आवश्यक आहे. त्यासाठी क्षेत्रीय स्तरावरील केंद्र प्रमुख, गट शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी ( प्राथ/माध्य, योजना ), लेखाधिकारी, अधीक्षक (शालेय पोषण आहार),जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) चे अधिव्याख्याता , वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक चे अधीक्षक व विस्तार अधिकारी संवर्ग इ. यांची नेमणूक शाळेस भेट देणारे पथक म्हणून करावी व शाळेस प्रत्यक्ष भेट देवून पटपडताळणी करण्यासाठी नेमणूक करण्यात यावी.

९. शिक्षणाधिकारी (माध्य/ प्राथ) यांनी शाळा निहाय पटपडताळणीचे नियोजन आपल्या पातळीवरुन एकत्रितपणे करावे. अंमलबजावणी प्रभावीपणे होईल याकडे लक्ष द्यावे.

Digitally signed by
SHARAD SHANKARGIRI GOSAVI
Date: 31-03-2026 13:27:16

( शरद गोसावी )
शिक्षण संचालक
प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे

Digitally signed by
PALKAR MAHESH MADHUKAR
Date: 30-03-2026 20:25:54

(डॉ. महेश पालकर)
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)